श्री गुरुपौर्णिमा उत्सव

१) सद्गुरु चिन्मय पादुका पुजन

२) श्री अनिरुद्ध कवच १ वेळा

॥ क्लेशनिवारक श्री अनिरुद्ध कवच ॥

श्रीगणेशाय नम: । ॐ अस्य क्लेशनिवारक श्रीअनिरुद्ध स्तोत्रमंत्रस्य प्रद्युम्न ऋषि: ।
श्रीगायत्री अनुष्टुप छंद: । श्रीपूर्णावतार श्रीकृष्ण चतुष्टय देवता ॐ हरि: ॐ । ॐ नमो नम: ।

॥ अथ ध्यानम् ॥

कृष्णनीलं महाबाहुं स्निग्धचक्षुं चन्द्राननम् । विशालपीनवक्षं च सकलक्ल्येशनिवारकम् ॥
वामहस्तेन वरदं दक्षिणेन दिग्दर्शकम् । वामपादेन अचलं दक्षिणेन गतिकारकम् ॥
नित्यानन्दं नरसिंहं ज्ञानभक्तोपदेशकम् । मुक्तिप्रदं सर्वरुपं भुक्तिप्रदं सर्वकामदम् ॥
सुराध्यक्षं करुणारसपूरितांगम् । जयन्तं नयन्तं नम: पुण्डरीकाक्षम् ॥
न अर्चनं न मत्रं न जानामि स्तुति: । न ध्यानं न दानं न च जानामि भक्तिम् ॥
न जाने योगं न च जाने जपं च तप: । परं जाने अनिरुद्ध तव अनुसरणं क्लेशहरणम् ॥
देहो मे अनिरुद्ध: पातु । मनोरक्षक पूर्णपुरुष: ॥ बुद्धिं पातु गोपालक: । भक्तिं नीलमेधावभास: ॥
पुरुषार्थे श्रियाश्लिष्ट: । आरोग्यं उचिताचारसुखद: ॥ विना यस्य ध्यानं न धर्मं न अर्थम् ।
विना यस्य ज्ञानं न कामं न मोक्षम् ॥ विना यस्य नामं न जयं न विजयम् ।
विना यस्य स्मरणं न भुक्ति: न मुक्ति: ॥ शरण्यं शरण्यं श्रीअनिरुद्धम् । शरण्यं शरण्यं मम इष्टदेवम् ॥
ॐ नमो भगवते वासुदेवाय श्रीकृष्णाय शंखचक्रगदापद्मधराय स्वाहा ।
ॐ नमो भगवते संकर्षणाय श्रीशेषाय सर्वमंगलाय स्वाहा ।
ॐ नमो भगवते प्रद्युम्नाय श्रीकामदेवाय बुद्धिरक्षकाय स्वाहा ।
ॐ नमो भगवते अनिरुद्धाय श्रीपुरुषोत्तमाय मन:सिद्धाय क्लेशनिवारकाय स्वाहा ।
ॐ महामत्स्याय नम: । ॐ हरिकूर्माय नम: । ॐ आदिवराहाय नम: । ॐ नरसिंहाय नम: ।
ॐ बटुवामनाय नम: । ॐ भृगुराज-परशुरामाय नम: । ॐ रामय रामभद्राय रामचन्द्राय नम: ।
ॐ कृष्णाय वासुदेवाय अनिरुद्धाय नम: । ॐ बुद्धाय पाण्डुरंगाय हृषीकेशाय नम: ।
ॐ श्री अनिरुद्धाय पूर्णपुरुषाय नमो नम: । ॥ हरि ॐ ॥

३) सद्गुरुतारक मंत्र १०८ वेळा

॥ ॐ मन:सामर्थ्यदाता श्रीअनिरुद्धाय नम: ॥

४) श्री गुरुक्षेत्रम् २४ वेळा

॥ ॐ श्रीदत्तगुरवे नम: ॥

श्रीगुरुक्षेत्र-बीजमन्त्र

ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे- सर्वबाधाप्रशमनं-श्रीगुरुक्षेत्रम् ।
ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे- सर्वपापप्रशमनं-श्रीगुरुक्षेत्रम् ।
ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे- सर्वकोपप्रशमनं-श्रीगुरुक्षेत्रम् ।
ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे- त्रिविक्रमनिलयं-श्रीगुरुक्षेत्रम् ।
ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे- सर्वसमर्थंसर्वार्थसमर्थं-श्रीगुरुक्षेत्रम् ॥

श्रीगुरुक्षेत्र-अंकुरमन्त्र

ॐ रामात्मा-श्रीदत्तत्रेयाय नम: । ॐ रामप्राण-श्रीहनुमन्ताय नम: ।
ॐ रामवरदायिनी-श्रीमहिषासुरमर्दिन्यै नम: । ॐ रामनातनु-श्रीअनिरुद्धाय नम: ।

श्रीगुरुक्षेत्र-उन्मीलनमन्त्र (कलिकापुष्पफलमन्त्र)

ॐ मानवजीवात्मा-उद्धारक-श्रीरामचन्द्राय नम: । ॐ मानवप्राणरक्षक-श्रीहनुमन्ताय नम: ।
ॐ मानववरदायिनी-श्रीआह्लादिन्यै नम: । ॐ मानवमन:सामर्थ्यदाता-श्रीअनिरुद्धाय नम: ।

५) श्री अनिरुद्ध चलिसा १ वेळा

॥ श्री अनिरुद्ध चलिसा ॥

दोहा

श्रीसद्गुरुसुमिरनबल सब कछु करत सुहाई ।
अनिरुद्ध नाम की रटन लगाई टूट गई दुख की डोरी ॥

चौपाई

जय अनिरुद्ध पूरण अवतारा । जय गोविंद परमसुखधामा ॥१॥
जय नंदारमणा बलवंता । रं रं रं रं जय अभिरामा ॥२॥
रात दिवस अनिरुद्ध धुन गांऊ । साथ में लायो सुचितसो दाऊ ॥३॥
सब रिषिजन मिल जपत महेशु । गोपगोपीजन गात रमेशु ॥४॥
कार्तिकमास की पूरणमासी । प्रगट भयो जै जै त्रिपुरारि ॥५॥
पूरणशक्ति सर्व सुखखानी । दयाकृपाकर बल का दानी ॥६॥
गोपीनाथजी दर्शन पावत । श्रीविठ्ठल के चरणा लागत ॥७॥
स्वामीकृपा से जप रट चालत । बंश तुम्हारे है प्रभु आवत ॥८॥
पाय आशिषा वृद्ध अपारा । कहत कहानी निज कुलदारा ॥९॥

कुल अपने है विठ्ठल आवत । निरगुण से जब सगुण प्रकाशत ॥१०॥
श्यामल रुप मुनिजन सेवि । द्वार खडै नौ निधि की देवि ॥११॥
भाल चंद्रमा शोभत नीका । सहज सूरज परभा हो फीका ॥१२॥
भगत ने जब ही नाम पुकारा । तब ही बापू दु:ख निवारा ॥१३॥
क्रिपा महान तुम सम नाही । राजा रंक भेद नहीं पाई ॥१४॥
साईनिवास में परगट ग्वाला । हेमाड्या की अंतिम ज्वाला ॥१५॥
पूजन मीनाभाभी कीन्हा । सद्गुरुरुप में दरसन दीन्हा ॥१६॥
सुरगणसहित इंद्र करी वंदन । भवभयनाशन खलदलमर्दन ॥१७॥
सूरजवंशी राम धराधर । चक्रपाणि हरि सद्गुण आगर ॥१८॥
नाम की सेज प्यार की माला । ह्रिदय सिंहासन बसत अकाला ॥१९॥
पुरुषार्था कलजुग भूल जाई । जुईगांव बस काज दिखाई ॥२०॥
पंचपुरुष श्रद्धा बतलाई । धरमचक्र रख शुरु लडाई ॥२१॥
भारतवास की गौ जो माता । तुम बन खडे गौ के त्राता ॥२२॥
नाश अधर्मा पालन धर्मा । यही कारण अवताराण वर्मा ॥२३॥
धरम ते भगति, जोग ही नामा । ज्ञान ते दर्शन अनिरुद्धधामा ॥२४॥
राम विराम सुखद अभिरामा । कलिमलभंजक अनिरुद्ध नामा ॥२५॥
जगत में एक प्राणपति बापु । तासु बिमुख किमी लह विश्रामु ॥२६॥
बापु नामसम बल कछु नाही । रुपु बल नाश करई छनमाही ॥२७॥
महापापी जब नाम सुमिरही । जोर अपार दुखसागर तरही ॥२८॥
निज इच्छा अनिरुद्ध अवतरइ । धरम प्रेम आनंदन लागी ॥२९॥
सेवा करबे वो बड भागी । चरम कृपालु बापु अनुरागी ॥३०॥
बापु नामबिनु करम अधुरा । श्रीदर्शन बिनु अन्न ही जहरा ॥३१॥
कोई मनोरथ बड मन माही । प्रयास करत पर फलवत नाही ॥३२॥
धीर धरहु ना होऊ उदासा । सब मिली जाऊ अनिरुद्धपासा ॥३३॥
अनिरुद्ध नाम प्रफुल्लित गाता । टरत ही पीड रोग दूर जाता ॥३४॥
देख चरण सुमंगलमूला । जानऊं बापु भगति अनुकूला ॥३५॥
परबत सम बडौ मम भागु । घोर पाप मालिक अनुरागु ॥३६॥
सदैव सरनागत हितकारी । करि रच्छण भवभयमलहारी ॥३७॥
बापु भगति को कहंऊ बखानी । सहज मार्ग जश पाव ही प्रानी ॥३८॥
अनिरुद्ध गावत पुलक सरीरा । गद्गद् बानी अंखी बह नीरा ॥३९॥
बापु चरणधूली मोहे अतिप्रेमा । तन मन धन सेवा द्रिढ नेमा ॥४०॥

दोहा

अनिरुद्ध चलीसा स्तोत्र यह इक मंत्र महान अपार ।
सर्व कामना पूरन प्रति व्यर्थ बचन ना जाय ॥
पिपा निरबुद्ध सहज जड, ना जाने जोग तप नेम ।
बापु क्रिपा नहि पाऊं तसि, जसि चरणन्ही प्रेम ॥
नंदापति अनिरुद्ध की जय । चक्रधर चिदानंद की जय ।
बोलो रे भाई दाऊ सुचित की जय जय जय ॥
॥ इति आद्यपिपाविरचितं श्रीअनिरुद्धचलीसास्तोत्रं सम्पूर्णम् ॥

६) श्री अनिरुद्ध पाठ १ वेळा

|| अनिरुद्ध पाठ ||

अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
वाचे घेता नांव जाई अहंभाव । येई सोऽहंभाव उदयासी ॥
जे हो गुरुनाम तेचि हरिनाम । जाणा हेचि वर्म भक्तीपंथी ।।
रामकृष्ण हरी बापू त्रिपुरारि । राहो ओठावरी नाम सदा ॥१॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध हरी मंत्र षडक्षरी । वाचे जो उच्चारी तो तरला ॥
अनिरुद्ध हरी जपे जो अंतरी । कामादि सहा अरि तेणे जिंकले ॥
अनिरुद्ध हरी स्मरा निरंतरी । तेणे मुक्ती चारी होती सिद्ध ॥
अनिरुद्ध हरी या नामगजरी । प्रगटे समोरी महाविष्णू ॥२॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध माझा वैकुंठीचा राजा । मज तन्नामाचा जडो छंद ॥
ह्रदयाचे स्पंदन श्वासाचे चलन । होवो त्यात गान अनिरुद्ध ॥
परा व पश्यन्ती मध्यमा वैखरी । गावोत एका स्वरी अनिरुद्
नसांत भिनावे रक्तात भिजावे । कंठी प्रगटावे गुरुनाम ॥३॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम हे पावन जेथे याचे गान । तेथे नारायण प्रतिष्ठित ॥
सोपे हे साधन नामसंकीर्तन । तेणेचि प्रसन्न चक्रपाणी ॥
हरिनामाहून गुरुनामस्मरण । आवडे हे कथन केशवाचे ॥
हरी तो निर्गुण होऊनिया सगुण । केले नामधारण अनिरुद्ध ॥४॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥

बापू साईनाथ स्वामी तो समर्थ । तोचि एक नाथ अनाथांचा ॥
द्वारकामाईत होता जो राहात । शिरडीचा संत अनिरुद्ध ॥
अक्कलकोटास होता ज्याचा वास । संतावसंत तो अनिरुद्ध ॥
तीही रुपे पूर्ण आजही तो पूर्ण । सर्वथा संपूर्ण अनिरुद्ध ॥५॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरु मकरंद यांचे राखी ब्रीद । ऐसा शिष्यकोविद अनिरुद्ध ॥
स्वामी आणि साई दोघे भिन्न नाही । हेचि तत्व देई अनिरुद्ध ॥
गुरु आणि भक्त होता एक चित्त । काही ना रहात अशक्य जगी ॥
ऐसी शिकवण आम्हासी देऊन । दिले सोपे साधन अनिरुद्धे ॥६॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध नाम गाई जो सप्रेम । त्यास नित्यनेम भेटे हरी ॥
गुरुनाम गोड ज्यास याचे वेड । कैवल्याचे झाड त्याच्या द्वारी ॥
अनिरुद्धपाठ पंढरीची वाट । चाले जो ही नीट तो उद्धरे ॥
नाम अनिरुद्ध पूर्ण ब्रह्म शुद्ध । करी हे समृद्ध साधकासी ॥७॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम हा साबण चित्त जे मलीन । त्याचे प्रक्षालन करीत असे ॥
नाम हरे भीती मना देई शक्ति । तेणे घडे भक्ती नवविधा ॥
घेऊनिया हाती नामाचा हातोडा । भिंत सारी पाडा तेलियाची ॥
तारेल संसारी नामाची ही होडी । नेई पैलथडी सुखेनैव ॥८॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अव्यक्ते आकारा आला हा पसारा । त्याच्या पैलपारा हरी राहे ॥
हरीचे जे स्थान तेचि गुरुस्थान । नाही दोघे भिन्न एकरुप ॥
हरीऊनी श्रेष्ट परि गुरुतत्व । गुरुचे महत्व सर्वोपरी ॥
वंदी नारायण गुरुचे चरण । ऐसे नाथवचन भागवती ॥९॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरु आणि हरी दोघे उभे समोरी । पाय आधी तरी गुरुचे धरा ॥
हरीच्या अगोदर गुरुनाम घ्यावे । सर्वाआधी वंदावे गुरुदेवा ॥
गुरुने दावीला गोविंद आम्हाला । म्हणूनी तयाला आधी स्मरू ॥
गुरु व गोविंद आम्हा अनिरुद्ध । नाम त्याचे सिद्ध कालत्रयी ॥१०॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरुनामजप निरसी विकल्प । करी एकरुप सद्गुरुसी ॥

नाम हे जपता पावे शिष्य गुरुता । ऐसी ही महता गुरुनामी ॥
गुरु नाम घ्या हो फोडूनिया टाहो । येईल पहा हो धावुनि हरी ॥
विष्णू अविनाशी भुले ना मायेसी । परि नामी त्यासी ओढ भारी ॥११॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरुनाम घेऊन जावे त्या शरण । करावे रुदन विरहानें ॥
आम्ही तुझे भक्त कैसे रे व्यथित । करी रे कृतार्थ आम्हा आता ॥
ऐसे जो वदून करील क्रंदन । द्रवेल हरिमन करुणेने ॥
सद्गुरुचे नाव विरहाचा भाव । यांनी वासुदेव भेटे झणी ॥१२॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामाचा पुकार इतुका प्रखर । वैकुंठी ना स्थिर राही नरहरी ॥
प्रल्हादाचा शब्द राखे नरहरी । आला स्तंभांतरी प्रगटून ॥
गजेंद्राची हाक जैसी परिसूनी । येई चक्रपाणि गरुडावरी ॥
ऐसा बहुतांसी नामे प्राप्त झाला । हरी ना निराळा नामाहुनी ॥१३॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामप्रेमे हरी पावे नामदेव । नामे ज्ञानदेव होई ज्ञानी ॥
नामाचा विस्तार आहे हो केवढा । आकाशाएवढा नामे तुका ॥
सद्गुरुनामात रमे एकनाथ । झाला भागवत नामे ऐका ॥
साऱ्या संतांचा हा एकचि विचार । नाम हेचि सार दृढ धरी ॥१४॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामातच राम नाम आत्माराम । नाम हा विराम संसृतीचा ॥
नामे हनुमान करी हो उड्डाण । नामे हे विमान श्रीरामाचे ॥
नामे सागरांत तरले पाषाण । मग का कठीण मानवासी ॥
अनिरुद्धराम हेचि एक नाम । ज्याचे शिवा प्रेम अनिवार ॥१५॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
हरी हर यात मानतो जो व्दैत । त्याचा परमार्थ व्यर्थ झाला ॥
दोघांचे एकत्व दावी गुरुदेव । ऐसी आहे माव सद्गुरुंची ॥
हरी हर मिळून झाले अवतीर्ण । गुरुरुपे दर्शन देती आम्हा ॥
जो विष्णु मुरारी तोच त्रिपुरारी । एक तो सर्वांतरी अनिरुद्ध ॥१६॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
हरीनाम घेता भेटे गुरु भक्ता । गुरुनाम घेता लाभे हरी ॥
होता हरी प्रसन्न भेटवी गुरुसी । लावी सत्पथासी गुरुरुपे ॥

सद्‌गुरुशिवाय ना दुजा उपाय । जोडण्या ते पाय श्रीहरीचे ॥
गुरु अनिरुद्ध भेटता अतूट । होई हरी प्रगट आपोआप ॥१७॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम दोन अक्षरे सद्‌गुरुचरण । ठेवा घट्ट धरुन अहर्निश ॥
सद्‌गुरुचे पाय ज्याने दृढ धरीले । त्यास भय नुरले कळिकाळाचे ॥
नाम गळे अहम उमळते प्रेम । मिळे पद परम नामामुळे ॥
नको योग ज्ञान वेद मीमांसन । सोपे हे सोपान गुरुनाम ॥१८॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामे मन:शुद्धी नश्यते कुबुद्धी । साधते समृद्धी विवेकाची ॥
विवेकाच्या बळे वैराग्य उजळे । तेणे श्रद्धा फळे गुरुवरी ॥
श्रद्धा बळकट सबूरीची वाट । गुरुच्या निकट नेई त्वरे ॥
विवेक वैराग्य श्रद्धा व सबूरी । नामे प्राप्त चारी साधकासी ॥१९॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
शास्त्रांचे हे शास्त्र मंत्राचा हा मंत्र । नाम हे पवित्र अनिरुद्ध ॥
दर्शने कुंठली वादात गुंतली । तेथ नामे केली सुखपूर्ती ॥
वेद त्रिगुणात अडकूनी गेले । नामे उल्लंघले त्रिगुणासी ॥
एक नाम नेई त्रिगुणाच्या पार । ऐसे नाम थोर अनिरुद्ध ॥२०॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामाचा हा वन्हि चेतविता मनी । पापराशी जळुनी जाती साऱ्या ॥
नामरुपी आप हरी भवताप । होई निर्विकल्प मनोवृत्ती ॥
विष्णुपदतीर्थ नाम हे पावन । करा रे प्राशन हृदयाने ॥
नाम तोडी पाश नाम मुक्ताकाश। नाम हा प्रकाश कैवल्याचा ॥२१॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम भागीरथी शिव धरी शिरी । पितरे उद्धरी नामगंगा ॥
नाम मोरपीस प्रिय श्रीहरीस । शोभे मुकुटास गोपाळाच्या ॥
कृष्णाचे स्वरुप कोणा न कळले । गोपांनी जाणले नामप्रेमे ॥
रामकृष्ण हरी विठ्ठल गोविंद । तोच अनिरुद्ध सदाशिव ॥२२॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अध्यात्माच्या दुग्धी भक्ती नवनीत । नाम तेथ घृत सार त्याचे ॥
साराचे हे सार भक्तीचे माहेर । नाम मूलाधार महाविष्णुचा ॥
इतर धावती मुक्तिचिया पाठी । नाम घेता पाठी लागे मुक्ती ॥

सगुणभजने निर्गुणाची प्राप्ती । ऐसी फक्त शक्ती नामामध्ये ॥२३॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्धपाठ सद्गुरुंचा माठ । हरीची ही पेठ गुरुनाम ॥
कासवीचे दृष्टी पोसे गुरुभक्ता । येई नाम घेता हा अनुभव ॥
गुरुनामचिंतनी जो लीन राहे । त्याची चिंता वाहे अनिरुद्ध ॥
कधीही कुठेही कुणीही हे घ्यावे । वाचे आळवावे अनिरुद्ध ॥२४॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
निंदा वाद बरळ हा वाचेचा विटाळ । हाती घ्यावे टाळ गावे नाम ॥
नाम एकतारी गर्जे ज्याच्या घरी । तेथेच श्रीहरी नित्य वसे ॥
अनिरुद्ध नामे लागले ज्या वेड । अव्यक्तापल्याड तोचि पावे ॥
योगीन्द्र हा दास अनिरुद्ध नाथ । त्यानेच हा पाठ वदवीला ॥२५॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
पाठ करी नित्य राखुनि सातत्य । त्यास दिसे सत्य बापुरुप ॥
गाई भक्तीभावे नामाचे पोवाडे । त्याच्या चोहीकडे बापू उभे ॥
नामाचा जो झाला नामी जो बुडाला । त्याचा रखवाला अनिरुद्ध ॥
अनिरुद्ध योगे योगीन्द्र हा धन्य । धरीले अनन्य गुरुनाम ॥२६॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥

७) श्री अनिरुद्ध ऋणज्ञापक स्तोत्र १ वेळा

॥ सद्गुरु श्रीअनिरुद्ध ऋणज्ञापक स्तोत्र ॥

अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
चौऱ्याऐंशी लक्ष योनित फिरलो । शेवटी मानवाच्या जन्मासी आलो ॥
तरीही मी तुझ्या कृपेस पात्र झालॊ । अनिरुद्धा,तुझा मी किती ऋणी झालो ॥१॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
जन्मान्तरी मी किती पाप केले । या जन्मीही तेच गिरविले ॥
मज तू तरीही जवळी घेतले । अधमाधम मी तुझा भक्त झालो ॥२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
कधी न घडली सत्संग,सेवा । कधी न स्मरलो देवाधिदेवा ॥
कधी ना मिळाला जीवा विसावा । तुझ्या दर्शने मी सुखात न्हालो ॥३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥

मनुष्यदेही पशुचीच वृत्ती । सदैव दैत्यासम ही आसक्ती ॥
नाही विवेक,नाही विरक्ती । असा पतित मी तव नामेचि तरलो ॥४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
सदा प्रेयविषयी लोलूप झालो । श्रेयासी तेणे पराङमूख झालो ॥
असा शत्रु माझा स्वये मीच झालो । तवोपदेशे सावध आजि झालो ॥५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
रसातिलोलूप माझी ही रसना । कठोर बोलून दुखवी जनांना ॥
सदैव वदते असत्य वचना । तुझे नाम घेता वाक्‌शुद्ध झालो ॥६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मनात येती विकल्प नाना । वैषयिक गुंता सुटता सुरेना ॥
स्थैर्य आणि शक्ती, मना मिळेना । तुझे ध्यान करिता मनी समर्थ झालो ॥७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
वृथा चोच करुनि पोसले हे शरीर । काये न केले मी परोपकार ॥
किती भोगपंकात रुतलो गंभीर । तुझ्या चरणस्पर्शे आज मी उद्धरलो ॥८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
कुतर्कयोगे मती भ्रष्ट झाली । यथासंचिते मी विपरीत झाली ॥
अतीचिकित्सेत ती व्यर्थ शिणली । तू ठेवता हात स्थितप्रज्ञ झालो ॥९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
बुद्धीच्या मदाने उन्मत्त झालो । वितंडवादात अडकूनी गेलो ॥
मीच तो शहाणा ऎसे समजलो । आज तव कटाक्षे अहंशून्य झालो ॥१०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
जोपासला मी किती अहंकार । विवेक विझला, दाटला अंधकार ॥
गुंता तमाचा विणला सभोवार । तुझ्या दिव्य तेजे प्रकाशी उजळलो ॥११॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
सेवा न घडली मातापित्यांची । दुरुत्तरे हृदये दुखवली मी त्यांची ॥
गाठली मी सीमा कृतघ्नतेची । असा कृतघ्न मी तव पायाशी आलो ॥१२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुवरिष्ठांस अवमानिले मी । आप्तेष्टमित्रांस निर्भत्सले मी ॥
स्वत:चेच म्हणणे केले खरे मी । असा दुष्ट मी तव दर्शनासी आलो ॥१३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
परदु:ख पाहुनी दाटला न उर । आले न माझ्या नयनात नीर ॥

किती निर्दयी मी होतो कठोर । तरी तुझ्या दयेच्या छायेत आलो ॥१४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
आहार,निद्रा,भय, कामी बुडालो । मी पुच्छविहीन पशूच बनलो ॥
फिरता फिरता तुझ्या दारी आलो । तुझ्या दारी येताच माणूस झालो ॥१५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
किती आधिव्याधी तू केल्यास शान्त । रक्षिलेस मजला घोर संकटात ॥
विसरलास ना मला तू अहोरात । स्मर्तृगामी बापू, दत्तगुरु ओळखलो ॥१६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
वाहे प्रेमगंगा तुझ्या महाद्वारी । नवस्वरात वाजे तुझी भक्तिबासरी ॥
अज्ञानछेत्रा तूच त्रिपुरारी । अनिरुद्धरुपे हरिहरास भेटलो ॥१७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुला दोन पैसे देता मी सत्वर । तू नऊ रुपयांचा दिलास हार ॥
न कळे असा कसा बापू सौदागर । उलटी तुझी खूण हे मी समजलो ॥१८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
नावाचा योगींद्र पण मी करंटा । मजसाठी का तू सोसतोस तोटा ॥
खरोखर देवाहून सद्गुरुच मोठा । अकारण करुणा तुझी अनुभवलो ॥१९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
जसे चिडीच्या पायास दोर । बांधूनी आणिती तिजला समोर ॥
तसेच मज तू ओढले खरोखर । तुला काळजी माझी हे मी उमगलो ॥२०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझ्या प्राजक्तापुढे फिका कल्पवृक्ष । दे ठाव गुरुपदी, नको स्वर्ग रुक्ष ॥
तुझ्या पायी राहीन, नको मजसी मोक्ष । मला तू हवास, हेच मागण्यास आलो ॥२१|
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझे नाम गाऊ, कीर्तनात नाचू । तुझ्या चरितातील अमृतकण वेचू ॥
भवार्णव लंघूनि तुझ्या दारी पोंचू । तुझ्या नामनौकेत मौजेत बैसलो ॥२२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तू आणि मी बापु, मिळता स्वभावे । साहजिक अद्वैत घडूनी यावे ॥
अशक्य ते शक्य तूची घडवावे । तुझ्या अनंत लीला पाहण्यात रमलो ॥२३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
उठल्या कितीही विकल्पलहरी । विरुन जातील धरिता सबूरी ॥
पाय सद्गुरुचे सोडू नये तरी । गुरुपायी सारे उपाय लाधलो ॥२४॥

अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मी यत्न करीता मज उद्धारासाठी । उभे घेउनि बापू दुधाची वाटी ॥
किती बापू भक्तार्थ करती अटाटी । भक्तवत्सला तुज मी शरण आलो ॥२५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
टेकता मी माथा तुझिया पायाशी । प्रेमे तू धरिसी मजला पोटासी ॥
जशी माय सांभाळी निजबालकासी । बापू जगदंबे, मी तुझा बाळ झालो ॥२६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
चमत्कार घडविसी असंख्य वेळा । परि तू राहसी नामानिराळा ॥
कोण जाणे तुझी अपरंपार लीला । जगद्गुरु कृष्णा, मी तुझा गोप झालो ॥२७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मनी स्थापिले भावसिंहासनास । पायघड्या म्हणूनि अंथरीला ध्यास ॥
प्रतिष्टीत व्हावे विनंती आपणास । बापू विराजीत होता सुखावलो ॥२८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मदर्थ झटतो किती बापू माझा । योगक्षेम वाही वैकुंठराजा ॥
सांग कसा होऊ उतराई तुझा । स्मरुनी ऋणांना तुझी वहाण बनलो ॥२९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझी वहाण होण्यास माझाच स्वार्थ । सोपविता तुज मी भारचि समस्त ॥
पुरविला मदहेत तू होऊनी मुदित । त्वत्कृपे स्वार्थात परमार्थ साधलो ॥३०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
सद्गुरु हा चंद्र असे पौर्णिमेचा । बाधे न क्षय ज्या कलादिकांचा ॥
सदा वर्षतो रस भक्तीसुधेचा । गुरुपूर्णचंद्राचा मी चकोर झालो ॥३१॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुपौर्णिमेची तिथी ही पवित्र । बरसावे गुरुऋण स्मरुनी नेत्र ॥
फिटे न गुरुऋण करु स्मरणमात्र । नित्य मी गुरुऋणी गुरुरंगी रंगलो ॥३२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुची कृपा हीच गुरुपुर्णिमा हो । प्रतिक्षणी आम्हा अनुभव लाहो ॥
गुरुच्या ऋणांचे अखंड स्मरण राहो । गुरुमाउलीच्या ऋणी मी बुडालो ॥३३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुदक्षिणा मी तुला देऊ काय । चराचर व्यापून उरती तुझे पाय ॥
माझे तरी काय तुझ्याशिवाय । तुझा मी तुझ्यातच समर्पीत झालो ॥३४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥

येई बा बापु,नको वेळ लावू । तुझ्या विरहाने व्याकुळला जीवू ॥
प्रेमे दोन अश्रू तुझ्या पायी वाहू । हे कृतज्ञतेचे तीर्थ मधुर प्यालो ॥३५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
अडाणी मी उपमा तुला काय देऊ । तुझे स्तवन कोणत्या शब्दात गाऊ ॥
त्यापेक्षा तुझे पाय धरुनी ठेवू । हेच एक आम्ही करुनी निमालो ॥३६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
एक परवलीचा आमुचा असे शब्द । हृदयात आमुच्या असे एक साद ॥
आनिरुद्ध अनिरुद्ध हेच आम्हा ब्रीद । अनिरुद्ध म्हणता भागवती झालो ॥३७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
आनिरुद्ध आनिरुद्ध आमुचा जपतपू । तुझे नाम घेता नासती षड्अरिपू ॥
ऐसा जनार्दन आनिरुद्ध बापू । आनिरुद्ध नामे अभयदान पावलो ॥३८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
महायती तू महाप्राण बापू । महाविष्णू तू परमाशिव बापू ॥
जगदम्ब तू सद्गुरुतत्व बापू । सर्वत्र मी तुझे रुप पाहू लागलो ॥३९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
कर्दळीवनीचा वटवृक्ष बापू । सद्गुरुस्थानीचा निम्बवृक्ष बापू ॥
सद्गुरुतत्वाचे प्राकट्य बापू । पटता तुझी खूण मी गहिवरलो ॥४०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
बापू एक माझी विनंती परिसावी । गुरुचरणऋणी मज नित्य ठेवी ॥
कृपा सर्वांवर ऐशीच रहावी । मी गुरुकृपेचा याचक एक झालो ॥४१॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझे वाक्य आमुचे महाकाव्य होवो । तुझे प्रेम चित्ती उसळूनी येवो ॥
मी तुझा, तु माझा, दाटो हा भावो । तुझ्या चरणांशी एकरुप झालो ॥४२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुऋणज्ञापक हे स्तोत्र गाई । तो गुरुपदीचा रहिवासी होई ॥
अनन्यत्वे त्यास गुरुराज पाही । गुरुस्फूर्तीने मी सत्य तेच वदलो ॥४३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
आनिरुद्ध स्वये ही स्तोत्रजाह्नवी । भक्तोद्धारार्थ मन्मुखे वदवी ॥
योगीन्द्र हा दास अक्षरे गिरवी । गुरुचीच गरिमा गिरवीत गेलो ॥४४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥

इति श्री सद्गुरुऋणज्ञापकस्तोत्र सम्पूर्णम् ।

८) श्री अनिरुद्ध महिमा १ वेळा

॥ श्री अनिरुद्ध महिमा ॥

अनिरुद्धे जयाची बुद्धी स्थिर । तयासी कैसे ताप दुस्तर । दर्शने सहजी हरेल फिकीर । भोग प्रखर नासती ॥
व्यापकत्व ऎसे अनन्त । कुठेही जरीही एकान्त । वा मिळविला लोकान्त । जाणितॊ वर्म सकळांचे ॥
केवळ एक दृष्टिपात । क्षणात होई पापाघात । टळेल जन्माचे दुरित । ढीग जाळीत ककर्माचे ॥
एकही शब्द न उच्चारिता । आशिषस्पर्श न करिता । देते अर्थ पूर्णचरिता । कृपासरिता तयाची ॥
करावया मनुजोद्धार । पातला हा धरणीवर । सगुणरुप पूर्णावतार । भक्ताधार सर्वस्वी ॥
क्रमून चौऱ्याऎंशी लक्ष योनि । होतो मानव सर्व फिरुनि । लागता अनिरुद्धाचे चरणी । कृतार्थ जीवन लाधतो ॥
नित्य सांगतसे एक ऎकावे । प्रपंची सदैव धर्मे असावे।प्रेमे जन्माचे सार्थक करावे।सावध रहावे नामस्मरणी
आनंदाचा हा महासागर । प्रेम कृपा अपरंपार । करीन रक्षण निरंतर । कैवल्य अपार दावतो ॥
किंचितही मागील पुण्य नसेल । तरीही जो हे चरण वरेल । अनिरुद्ध अनिरुद्ध सदा वदेल । मार्ग पावेल सहजता
श्रद्धा नाही भक्ती नाही । अज्ञानाची गोणी वाही । अपघाते जरी हे चरण पाही । त्यासही रक्षी संकटी ॥
करा श्रम गाळा घाम । घ्या सदा हरिगुरुनाम । हाच असे श्रेष्ट नियम । उच्चरवे सांगतसे ॥
प्रत्येका लागे मन समर्थ । झाले सर्व खटाटोप व्यर्थ । अनिरुद्धाचे वचन तदर्थ । सदैव मनी स्मरावे ॥
तू आणि मी मिळून पाही । अशक्य असे काहीही नाही । देतो मुक्तकंठे ग्वाही । राजाधिराज अनिरुद्ध ॥
सर्व शक्तींचे मूळ मानसी।त्याची समर्थता कधी न गवसी।स्मर अनिरुद्धाचे महावाक्यासी।सामर्थदाता हाचि असे ॥
आज्ञापालन सेवा नियमन । नामसंकीर्तन अधिध्यासन । हेचि जाणावे तपसाधन । सुगम संपन्न सहजचि ॥
श्रद्धा राखावी निखळ । मन करावे निर्मळ । सेवा करावी सकळ । प्रपंच बख्खळ होईल ॥
नाही त्यागावी दारा । नाही सोडावे घरा । तरीही पावावे परमार्था । अनिरुद्ध नामे ॥
अर्थ अनर्थ मी न जाणतो । योग्य अयोग्य न ओळखतो । चरण तुझे मी धरतो । सांभाळी आता ॥
नावडे मज ग्रंथज्ञान । नको मज मानसन्मान । दशेंद्रिय अकरावे मन । करितो अर्पण तव चरणी ॥
जे जे मजसाठी उचित । तेचि तू देशील खचित । हे मात्र मी नक्की जाणीत । नाही तकरार राघवा ॥
अरे देवा सद्गुरुराया । आनंदघना निरामया । सगुणब्रह्म भक्तसखया । पाहि माम् पाहि माम् ॥

९) श्री अनिरुद्ध श्लोकी १ वेळा

॥ श्लोकी ॥

हरिरुप अनिरुद्धे पृथ्वीतत्वासी आले । हरतत्व अनिरुद्धे मायोपाधित झाले ।
भयदु:ख अनिरुद्धे सज्जनांचे पळाले । बोल बोल वाचे श्रीअनिरुद्ध आले ॥
अत्यंत प्रीती नामे भजन शुद्ध भावे । करावे सदा रंगरंगूनी स्वभावे

अनिरुद्धस्तवनातें मन रंगवावे । पाप ताप जळती अनळ सहज भावे ॥
सकल दुष्ट बीजे नासती मानसीची । अखिल संत मीते नाचती सहस्त्रीची ।
अनिरुद्ध नाद जैसा उठे अंतरीचा । सुखानंद कंद तैसा होय जीवनाचा ॥
जगी नाचते सैन्य ते दानवांचे । शिरी लाविती मुंडके सज्जनांचे ।
तुझिया पदी अर्पितो शुद्ध भाव । खलमर्दनाचा जाणूनी तुझा माव ॥
तव कृपा कवणाही दूर कधी करेना । जाणूनी असंख्य पापे क्रोध कधी धरेना ।
पदकमळ वंदाया सर्व सृष्टी निघाल्या । अनिरुद्ध पाहताना सर्व दृष्टी निमाल्या ॥

१०) श्री सद्गुरु गायत्री मंत्र(सूक्ष्म) २४ वेळा

ॐ मन: प्राण: प्रज्ञा । ॐ तत् गुरुदत्तस्य उष्णं स्निग्धं गुरुर्तेजो धीमही ।
रामे चित्तलय: भवन्तु न: । ओज: अनिरुद्धराम: प्रचोदयात् ॐ ॥

११) श्री सद्गुरु गायत्री मंत्र(स्थूल) २४ वेळा

ॐ सच्चित्सुखाय विद्महे । नन्दापतये च धीमही । तन्नो अनिरुद्ध: प्रचोदयात् ॥

१२) सत्संग

१३) आरती